PHILIPS EMPLOYEES' UNION : BOMBAY
C-3, Anagha, Sarojini Naidu Road, Mulund (West), Bombay 400 080

This is the pledge that 800 worker - activists belonging to various organisations had taken in Bombay on Friday, 7th May,1993 :

"*I, ............. (Name of the Worker), a worker of this great nation, hereby take a firm vow that never, never, shall I support or vote for the POLITICIAN, who supports - or accords his silent approval - or actually votes for the proposed highly detrimental 'Employees' Pension Scheme'.*
*Similarly, I also take a firm vow that never, never, shall I work or support or vote for the POLITICAL PARTY which aids - or accords a silent approval - or votes for - the proposed 'Employees' Pension Scheme' which is so detrimental to the interests of workers and/or their families.*"

Thousands of more workers are taking the pledge every month. Have you taken this solemn pledge? If not do it today.

## THE TOP TWELVE REASONS WHY THE EMPLOYEES' PENSION SCHEME IS DETRIMENTAL TO THE INTERESTS OF ALL WORKERS

1. It is not the third benefit.
2. The principal amount of the accumulated employers' contribution will never be returned.
3. Interest of 12% paid on the employers' contribution will now never be paid.
4. The Rs.5,000/- crores accumulated in FPF will be swallowed.
5. Government has shirked off its responsibility of contributing 1.17% of employees' salary. It will also stop paying administrative expenses. The contributions (including for Administrative Expenses) for Employees' Deposit Linked Insurance scheme, would also be discontinued.
6. Pension not being linked to consumer price index.
7. Bare minimum pension - much less than minimum wages.
8. Will drastically reduce the loan quantum.
9. Workers will not get their normal pension unless they reach the age of 58.
10. Employees will have to depend on monthly pension, that too from a thoroughly inefficient and corrupt administration.
11. The Scheme is blatantly discriminatory.
12. They claim that workers, even after retirement are not mature enough to handle and protect their lifetime provident fund savings, and that the workers indulge in wasteful expenditure.

**Issued for generating awareness among the working class in the country, about the highly detrimental effects of the Family Pension Scheme and the New Employees' Pension Scheme**

Reg. No.: 4158 of 1962 (T.U.Act) and 15 of 1989 (MRTU & PULP Act)

PHILIPS EMPLOYEES' UNION : BOMBAY
C-3, Anagha, Sarojini Naidu Road, Mulund (West), Bombay 400 080

विविध कामगार संघटनांच्या ८०० कामगार-कार्यकर्त्यांनी, शुक्रवार दिनांक ७ मे १९९३ रोजी आयोजित मेळाव्यात केलेली प्रतिज्ञा.

मी ——————————————— (कामगाराचे नांव) या महान देशातला एक कामगार अशी दृढ प्रतिज्ञा करतो की अशा कोणत्याहि राजकीय नेत्यास जो सरकारनियोजित अतिशय हानिकारक अशा "कामगार निवृत्ति वेतन योजने"ला मूकपणे मान्यता दर्शवील किंवा जो या योजनेच्या समर्थनार्थ मतदान करील, यापुढे मी कोणत्याहि प्रकारचा पाठिंबा देणार नाहीं, आणि निवडणुकीत माझें मतहि देणार नाही.

त्याचप्रमाणे मी आणखीहि अशी ठाम प्रतिज्ञा करतो की सरकारनियोजित अतिशय हानिकारक अशा "कामगार निवृत्ति योजने"ला मान्यता देण्यासाठी जो कोणी राजकीय पक्ष प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे साह्यभूत होईल किंवा मूक संमति दाखवील किंवा या योजनेच्या समर्थनार्थ आपले होकारार्थी मत देईल अशा पक्षासाठी मी कधीहि काम करणार नाही, अशा पक्षाला पाठिंबा देणार नाही आणि निवडणुकीत माझे मतहि देणार नाही.

हजारो कामगार प्रतिमासी अशा प्रकारची प्रतिज्ञा करीत आहेत. आपण ही प्रतिज्ञा केलीत का? नसेल तर चला, वेळ दवडू नका. प्रतिज्ञा-बद्ध व्हा!

---

**नियोजित कामगार निवृत्ती-वेतन योजना कामगार हितास हानिकारक कशी? बारा प्रमुख कारणे —**

---

१. सरकार-प्रस्तावित निवृत्ती वेतन योजना कामगारांसाठी (प्रॉव्हिडंट फंड आणि ग्रॅच्युईटी व्यतिरिक्त) 'तिसरा फायदा' नक्कीच नाही.

२. मालकांकडून भविष्य निर्वाह निधीत जमा होणारी रक्कम, जी कामगारांच्या मालकीची असते, ती कामगारांना कधीच परत मिळणार नाही.

३. मालकांचे वर्गणी वरील १२% दराने पूर्वी प्राप्य असणारे व्याज हि कामगारांस यानंतर मिळणार नाही.

४. कुटुंब निवृत्ती-वेतन योजनेत सांठलेले ५००० कोटी रुपये सरकार गिळंकृत करणार.

५. सरकारची १.१७% वर्गणी भरण्याची जबाबदारी सरकारने टाळली असून यापुढें योजनेचा व्यवस्थापन खर्च देखिल सरकार करु इच्छित नाही. तसेच 'एम्प्लॉइज् डिपॉझिट लिंकड् इन्शुअरन्स स्कीम' (EDLI) ची वर्गणी आणि व्यवस्थापन खर्चहि सरकार यापुढे भरणार नाही.

६. निवृत्ती-वेतन ग्राहक निर्देशांकाशी निगडीत राहणार नाही.

७. किमान निवृत्ती वेतन, कायद्याने 'देय' ठरविलेल्या किमान वेतना पेक्षाहि कमी दिले जाणार आहे.

८. कामगारांना भविष्य-निर्वाह-निधीतून मिळणाऱ्या कर्जाच्या रकमेत जबरदस्त कपात होणार.

९. वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्या शिवाय कामगारांना नेमून दिलेले निवृत्ती-वेतन मिळणार नाही.

१०. मासिक निवृत्ती वेतन मिळविण्यासाठी कामगारांस अतिशय भ्रष्ट आणि अकार्यक्षम व्यवस्थापनावरच पूर्णतः अवलंबून रहावे लागेल.

११. सदर योजना मुळातच भेदाभेदावर आधारित आहे. निवृत्त कामगारांना न्याय मिळणे केवळ अशक्य.

१२. कामगारांना आयुष्यभराच्या काबाड कष्टाने प्राप्त होणारा द्रव्यनिधी योग्यपणे वापरण्याची अक्कल वयाच्या ५८व्या वर्षानंतरहि येऊ शकत नाही आणि कामगार आपला पैसा वाटेल तसा उधळून टाकतात या चुकीच्या गृहीतावर योजनेचे तत्वज्ञान आधारलेले आहे.

---

**नियोजित कर्मचारी निवृत्ती-वेतन योजनेच्या (EPS) अत्यंत हानिकारक परिणामांची जाणीव करुन देण्याकरिता आणि सदर योजने विरोधात जनजागृती निर्माण करण्याच्या प्रयत्नांत, फिलिप्स एम्प्लॉइज् युनियन, मुंबई द्वारा प्रकाशित आणखी एक पत्रक.**

Reg. No.: 4158 of 1962 (T.U.Act) and 15 of 1989 (MRTU & PULP Act)